आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता
१५ फेब्रुवारी २०२५ शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पारंपरिक समुदायांच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष न करण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं नवसंशोधक आणि उद्योजकांना आवाहन

- बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्यासंदर्भात राज्य सरकारकडून पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन

- सीबीएसईच्या १० वी आणि १२ वीच्या परीक्षांना सुरुवात

- ज्येष्ठ पर्यटन व्यावसायिक केसरी पाटील यांचं निधन

**आणि**

- महिला प्रीमिअर लीग टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना

**<><><><><>**

नवसंशोधक आणि उद्योजकांनी पारंपरिक समुदायांचं उपजत ज्ञान दुर्लक्षित करता काम नये असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या आज झारखंडमध्ये रांची इथं मेसरा इथल्या बिर्ला तंत्रज्ञान संस्थेच्या अमृतमहोत्सव सोहळ्यात बोलत होत्या. ए आय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रशिक्षण यांच्यात झालेल्या अनोख्या बदलांमुळे भविष्यात नाट्यमय परिवर्तन अनुभवायला मिळेल असं त्या म्हणाल्या. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचा उत्साह आणि वचनबद्धता महत्वपूर्ण भूमिका निभावत असल्याचं त्यांनी सांगितलं. विज्ञान, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि गणिताच्या शिक्षणात मुलीही मागे नसल्याचं मुर्मू यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

विधी विद्यापीठातून केवळ कायद्याची अक्षर ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, इतिहास, कायद्याचा व्यावहारिक उपयोग आणि अंमलबजावणी समजून घेणं आवश्यक असतं, असं प्रतिपादन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी आज केलं. नागपूरच्या वारंगा इथल्या महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ-नागपूर, चा तिसरा दीक्षांत समारंभ आज झाला, त्यावेळी मुख्य अतिथी म्हणून ते संबोधित करत होते. या समारंभात, एकूण १५५ पदवीधरांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. ज्यामध्ये ११२ पदवीपूर्व पदव्या, २८ पदव्युत्तर पदव्या आणि १५ पीएच.डी. पदव्या समाविष्ट होत्या.

<><><><><>

बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्यातल्या कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारनं राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीत महिला आणि बालकल्याण विभाग, अल्पसंख्याक व्यवहार विभाग, विधी आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग या विभागांचे सचिव तसंच गृह विभागाच्या उपसचिवांचा समावेश आहे.

ही समिती बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विषयी राज्यातल्या सद्यस्थितीचा अभ्यास करेल, आणि यासंदर्भातल्या तक्रारींवरील कार्यवाहीसाठीच्या उपाययोजना सुचवणार आहे. यासोबतच ही समिती या मुद्यांशी संबंधीत इतर राज्यांमधल्या कायदेशीर तरतुदी आणि कायदेही तपासून पाहणार आहे.

या संदर्भात राज्य सरकारनं शुक्रवारी रात्री उशिरा अधिसूचना जारी केली होती.

**<><><><><>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांना आजपासून प्रारंभ झाला. देशातल्या ७ हजार ८४२, तर परदेशातल्या २६ केंद्रांवर या परीक्षा होत आहेत. यंदा ४२ लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

यंदा इयत्ता दहावीच्या परीक्षांसाठी २४ लाख १२ हजारापेक्षा जास्त तर बारावीच्या परीक्षांसाठी १७ लाख ८८ हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून ते १२० विषयांमध्ये परीक्षा देणार आहेत. भारतात ७ हजार ८४२ परीक्षा केंद्रे, तसेच परदेशी केंद्रांवर ही परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. दहावीच्या परीक्षा १८ मार्च, तर बारावीच्या परीक्षा ४ एप्रिल रोजी संपणार आहेत.

विद्यार्थ्यांना परीक्षांमुळे येणाऱ्या तणावाच्या व्यवस्थापनात मदत करण्यासाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं समुपदेशन सेवाही सुरू केली आहे. सोमवार ते शनिवार सकाळी साडेनऊ ते संध्याकाळी साडेपाच या वेळात ही सेवा उपलब्ध असेल.

**<><><><><>**

निधीचा कथित अपहार केल्याच्या आरोपावरून मुंबई पोलिसांनी न्यु इंडिया सहकारी बँकेचा व्यवस्थापक आणि लेखा विभागाच्या प्रमुखावर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात १२२ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असून हा खटला पुढील चौकशीसाठी आर्थिक गुन्हे विभागाकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

**<><><><><>**

राज्यातली विमान सेवा आणखी तत्पर आणि सुकर करण्याच्या उद्देशानं नांदेड, लातूर, यवतमाळ, सोलापूर आणि अमरावती विमानतळ लवकरच शासन खाजगी कंपनीकडून एमआयडीसीकडे हस्तांतरित करणार असल्याची माहिती

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. नांदेड आणि परभणीच्या दौऱ्यावर आले असताना सामंत यांनी विविध योजनांचा आढावा घेतला आणि बातमीदारांशी संवाद साधला.

<><><><>

'केसरी टूर्स' च्या माध्यमातून पर्यटकांना जगभर पोहोचवणारे केसरी पाटील यांचं आज सकाळी मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. संध्याकाळी त्यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

पर्यटन व्यवसायातले रोजगार आणि व्यवसाय तसंच व्यवस्थापन संधीची माहिती देऊन अनेकांना या क्षेत्रात येण्याची प्रेरणा देण्यात ते मार्गदर्शकाची भूमिका बजावत असत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी केसरी पाटील यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. पर्यटन क्षेत्रातल्या संधीची ओळख करून देणारे आणि महाराष्ट्राचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारे उद्यमी म्हणून केसरी पाटील यांचं नाव सदैव स्मरणात राहील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदरांजली वाहिली आहे. तर केसरी पाटील यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनक्षेत्राचा दीपस्तंभ अस्तंगत झाला आहे, अशा भावना एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या आहेत.

-<><><><>

आगामी कुंभमेळ्यासाठी प्रशासकीय स्तरावर योग्य नियोजन करताना रस्ते आणि तत्सम कामासाठी तातडीनं भूसंपादन करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. ते काल नाशिकमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात कुंभमेळा आढावा बैठकीत बोलत होते. गोदावरी नदीच्या शुद्धीकरणासाठी कार्यवाही करावी.

शून्य अपघात, वाहतूक नियोजन, ध्वनीक्षेपणाची व्यवस्था तसंच सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यावर लक्ष द्यावं असंही शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत १५ पैकी १४ आमदार महायुतीचे निवडून देत नाशिक जिल्ह्यानं इतिहास रचला असून याची दखल घेत नाशिकच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते काल नाशिकमध्ये हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर झालेल्या सभेत बोलत होते. नाशिकच्या विकासासाठी 'नार- पार- गिरणा' हा सुमारे सात हजार कोटी रुपयांचा नदी जोड प्रकल्प मंजूर केल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर जवळ हिवाळी इथं भरणारी जिल्हा परिषदेची शाळा हा एक पथदर्शी प्रकल्प असून राज्यात अशा प्रकारच्या शाळा सुरू करण्यावर भर दिला जाईल असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते काल नाशिकमध्ये या शाळेला भेट दिल्यानंतर बोलत होते. ही शाळा तब्बल ३६५ दिवस भरत असून विद्यार्थ्यांना १ हजार ३५० पर्यंतचे पाढे पाठ आहेत. शिंदे यांनी ही शाळा चालवणारे शिक्षक केशव गावीत यांचा सपत्नीक सत्कार केला.

**<><><><><>**

प्रयागराज जिल्ह्यात कार आणि बसची जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात दहा जणांचा जागीच मृत्यू झाला असून एकूण १९ जण जखमी झाले आहेत. छत्तीसगड राज्यातल्या कोरबा इथून प्रयागराज कडे जाणारी गाडी प्रयागराजहून वाराणसीकडे जाणाऱ्या बसवर आदळल्यानं हा अपघात झाल्याचं प्रयागराजचे पोलीस आयुक्त तरुण गाबा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महिला प्रीमिअर लीग टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्स विरोधात होणार आहे. आज संध्याकाळी साडेसात वाजता वडोदरा इथं हा सामना सुरू होईल.

दरम्यान काल  झालेल्या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं गुजरात जायंट्सचा ६ खेळाडू आणि ९ चेंडू राखून पराभव केला. विजयासाठी गुजरातनं दिलेलं २०२ धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं केवळ ४ खेळाडूंच्या मोबदल्यात पार केलं.

//<><><><><>//